नि.दि.मु.क्र. २०/२०१७
निशाणी ४९ सोबत

**<u>प्रतिवादी क्र. १ ते ४ तर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा उर्वरित उलटतपास विधीज्ञ श्री. एच. एम. कुलकर्णी यांचे मार्फत शपथेवर सुरु</u>**

हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणांमध्ये दाखल दत्तक पत्राचे लिप्प्यांतर हे मुळ दस्तावरून करण्यात आलेले नाही. प्रस्तुत प्रकरणांमध्ये गोगटे मॅडम व पोतदार यांनी वाटणीपत्राचे केलेल्या लिप्प्यातंराच्या प्रती मी अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत. साक्षीदार परत सांगतो की, वाटणी पत्राचे लिप्प्यांतर गोगटे मॅडम यांनी केले आहे व पोतदार यांनी वाटणीपत्राचे लिप्प्यांतर केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणामध्ये नि. क्रं. ५३/६ व ५३/८ वर दाखल वाटणीपत्राच्या झालेल्या तारखा भिन्न आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर दोन्ही वाटणीपत्राच्या दस्तामधील मिळकतीचे वर्णन व मजकुर भिन्न भिन्न आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाटणीपत्रकाचे केलेले दोन्ही लिप्प्यांतर बरोबर आहेत किंवा कसे याची शहानिशा मी त्रयस्थ तज्ञ व्यक्ती कडुन केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर वाटणीपत्रकामध्ये लक्ष्मण सखाराम कदम यास गहाण म्हणुन दिलेल्या मिळकतीचे वर्णन केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण सखाराम कदम यास कब्जेगहाण खताने दिलेल्या जमीनींचा तपशील नमुद असणारी वाटणीपत्र मी याकामी दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, याकामी दाखल गोगटे व पोतदार यांनी केलेली लिप्प्यांतरे खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण सखाराम कदम यास गहाण ठेवलेल्या मिळकती एकत्र कुटुंबामध्ये सामाईक ठेवल्याचे मी खोटे सांगत आहे.

हे म्हणणे खरे आहे की, रघुनाथ कदम यांनी लक्ष्मण कदम याचे विरूद्ध रे.दि.मु. नं. ३७/१९९२ हा दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दावा दाखल करणेपुर्वी मला रे.दि.मु. नं. ३७/१९९२ बाबत माहिती होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्याविरूद्ध केलेल्या अपीलाची देखील मला प्रस्तुत दावा दाखल करणेपुर्वी माहिती होती. हे म्हणणे खरे आहे की, रे.दि.मु. नं. ३७/१९९२ अथवा त्यावर झालेल्या अपीला मध्ये पक्षकार करावे म्हणुन माझ्या वडीलांनी अर्ज दिला

नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, रे.दि.मु. नं. ३७/१९९२ व या दाव्यातील वाद मिळकती या एकच आहेत. हे म्हणणे खरे आहे की, रे.दि.मु. नं. ३७/१९९२ मध्ये कब्जेगहाण दिलेल्या मिळकती परत मिळाव्या अशी रघुनाथ ची मागणी होती. हे म्हणणे खरे आहे की, लक्ष्मण कदम हे माझ्या भावकीतील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, रे.दि.मु. नं. ३७/१९९२ मध्ये माझ्या अथवा माझ्या वडीलांचे वाद मिळकतीमध्ये कोणतेही हक्क व अधिकार नसल्यामुळे त्यांनी सदर दाव्यामध्ये पक्षकार म्हणुन समावेश करणेबाबत अर्ज दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, रे.दि.मु. नं. ३७/१९९२ व त्यावर झालेल्या अपीलामध्ये देखील रघुनाथ कदम हे सदर दाव्यातील वादमिळकतीचे मालक आहेत असे जाहीर करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर झालेला निकाल मी आव्हानित केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, लक्षमण कदम याच्याकडे गहाण ठेवलेल्या मिळकती सोडविण्यासाठी माझ्या वडीलांनी त्यांच्या हयातीमध्ये कोणताही दावा दाखल केलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतीमध्ये माझ्या वडीलांचा कोणताही हक्क संबंध नसल्यामुळे कोणताही दावा दाखल केला नव्हता.

हे म्हणणे खरे आहे की, बापू दादा कदम यांने लक्ष्मण सखाराम कदम याचे विरूद्ध तासगांव येथील न्यायालयात सि.सि. क्रं. १२६३/१९४९ हे प्रकरण दाखल केले होते. हे म्हणणे खरे नाही की, गहाण खताची रक्कम रू. ५००/- केवळ बापू यानेच अदा केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर गहाण खताची अर्धी रक्कम माझ्या वडीलांनी अदा केल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा मी या कामात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, बापू यांने गहाण खताची रक्कम फेडलेबाबतचा दस्त मी पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी गहाण खताच्या बाबतीत झालेला न्यायालयाचा निकाल पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर निकालन्वये प्रस्तुत प्रकाणांतील वाद मिळकती गहाण खतामधुन मुक्त होवुन बापूच्या मालकी हक्कात मिळाल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, सदर गहाण खताबाबतच्या प्रकरणांमध्ये कृष्णा व बापू हे पक्षकार नव्हते.

हे म्हणणे खरे आहे की, १९८५ साली बापूच्या निधनानंतर लक्ष्मणच्या वारसांनी वादमिळकतीचा ताबा घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिळकती परत मिळाव्यात म्हणुन रे.दि.मु. नं. ३७/१९९२ रघुनाथ ने दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर दावा मंजुर होवुन रघुनाथ यास मालक म्हणुन जाहीर करण्यात आले व वाद मिळकतीचा कब्जा देण्यात आला. हे म्हणणे

खरे आहे की, सदर कब्जा देण्याच्या प्रक्रियेस मी अथवा माझ्या वडीलांनी आव्हान दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दाव्याबाबतची माहिती मला डिसेंबर २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात समजल्याचे मी खोटे सांगत आहे.

प्रश्न - दत्तुने त्यांच्या हयातीमध्ये अथवा त्यानंतर तुम्ही वादमिळकतीचा मालक असल्याचे कोणत्याही न्यायालयाने जाहीर केलेले नाही

उत्तर - तसा दावा केला नसल्यामुळे जाहीर केलेले नाही.

हे म्हणणे खरे नाही की, माझा अथवा माझ्या वडीलांचा प्रस्तुत दाव्यातील वादमिळकतीशी कोणताही हक्क संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत दावा दाखल करणेसाठी कोणतेही कारण घडलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत दाव्यामध्ये केलेल्या सर्व मागण्या खोटया व चुकीच्या आहेत.

आता मला निशाणी क्रं. ५३/१३ वरील फे.फा. क्रं. ३३८१ दाखवण्यात आला. सदर दस्त सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्यास **निशाणी ९१** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, सदर फेरफारास मी आव्हानित केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रं. १ ते ४ यांच्या मध्ये झालेल्या वाटपपत्रास मी कोणत्याही न्यायालयात आव्हानित केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्रं. ३३८१ व प्रतिवादी क्रं. १ ते ४ यांच्यामध्ये झालेल्या वाटणीदस्तातील मजकुन मला मान्य असलेने मी त्यास आव्हानित केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १३.०८.१९४१ रोजीच्या मान्यता पत्राबाबत प्रस्तुत दाव्यामध्ये कोणताही उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना मानसिक त्रास व आर्थिक नुकसान व्हावे म्हणुन प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे प्रतिवादी १००००/- रू. नुसकान भरपाई मिळणेस पात्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेर सरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2025.12.06 17:08:37 +0530

**कवठे महांकाळ** **(एम. ए. कुलकर्णी)**

**दिनांक : ०६/१२/२०२५** सह दिवाणी न्यायाधीश 'क'स्तर,

कवठेमहांकाळ